


RNI NO-MAHMAR/2022/90217

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ

Email- jansanchlan@gmail.com
Mob- 9822720784




वर्ष ३ रे अंक : १९२ वा सोमवार दि १५ सप्टेंबर २०२५ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये

# युतीच्या चर्चेत राज ठाकरेंचं पारडं जड?

## उद्धव दादू बॅकफूटवर जाण्याची चिन्हं, तो मुद्दा ठरणार गेमचेंजर...

**वृत्तसंस्था/मुंबई**

आगामी महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मनसे प्रमुख राज ठाकरे आणि शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांची युती निश्चित मानली जात आहे. मात्र या युतीमध्ये राज ठाकरे यांचं पारडं जड असल्याचं बोललं जात आहे. उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेची अवस्था सध्या नाजूक आहे. २०२२ मध्ये एकनाथ शिंदे यांच्या बंडामुळे शिवसेनेत फूट पडल्यानंतर ठाकरे गट दिवसेंदिवस खिळखिळा होताना दिसतो. गेल्या वर्षी झालेल्या विधानसभा निवडणुकीतही ठाकरेंना केवळ २० जागा मिळाल्या. गेल्या तीन वर्षात अनेक बडे नेते, माजी मंत्री-आमदार यांच्यापासून माजी नगरसेवक आणि कार्यकर्त्यांनीही उद्धव ठाकरेंची साथ सोडल्यामुळे मराठी मतांसाठी त्यांना राज ठाकरेंच्या मदतीची गरज आहे, असे राजकीय विश्लेषकांचे मत आहे. बाळासाहेब ठाकरे यांनी स्थापन केलेल्या शिवसेनेने जवळपास तीन दशकं मुंबई महानगरपालिकेवर () निर्विवाद वर्चस्व राखलं होतं. २०१७ च्या महापालिका निवडणुकीत भाजप शिवसेनेच्या अगदी जवळ पोहोचली, त्यामुळे शिवसेनेचं वर्चस्व एकहाती नसल्याचं दिसून आलं. त्यावेळी राज्यात युती असतानाही भाजपने विरोधी बाकावर बसून शिवसेनेला महापालिकेचा कारभार हाती घेऊ दिला. परंतु शिवसेनेला अनेक मुद्द्यांवर घेरण्याचाही प्रयत्न केला. उद्धव ठाकरे हे आशियातील सर्वात श्रीमंत अशा मुंबई महापालिकेला दुभती गायफ किंवा सोन्याचं अंडं देणारी कोंबडी मानतात, असा आरोपही विरोधकांनी केला होता. १९ एप्रिल रोजी चित्रपट निर्माते-अभिनेते महेश मांजरेकर यांच्यासोबत पॉडकास्टमध्ये राज ठाकरे म्हणाले होते की, मराठी अस्मितेसाठी आणि महाराष्ट्राच्या कल्याणासाठी मी सर्व काही विसरण्यास तयार आहे. त्याच दिवशी उद्धव ठाकरे यांनीही मतभेद विसरून एकत्र येण्याची तयारी दर्शवली. २० एप्रिल रोजी संजय राऊत यांनी या भेटीला भावा-भावांमधील भावनिक संवादङ्खङ्ख असे म्हटल्यानंतर दोन्ही पक्ष एकत्र येण्याच्या शक्यतेला अधिक बळ मिळाले दरम्यान, शाळांसाठीच्या त्रिभाषा धोरणाच्या मुद्द्यावर उद्धव आणि राज ठाकरे यांनी एकत्र येत जोरदार विरोध दर्शवला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील युती सरकारने जीआर मागे घेतल्यानंतर ठाकरे बंधूंनी जुलैच्या सुरुवातीला एकत्र विजय रॅली काढली. यामुळे ठाकरे कुटुंबातील मतभेद कमी झाल्याचे संकेत मिळाले. २७ जुलै रोजी राज ठाकरे यांनी उद्धव ठाकरे यांच्या मातोश्री निवासस्थानी जाऊन त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या, तर ऑगस्ट महिन्यात उद्धव ठाकरे आणि त्यांच्या कुटुंबीयांनी राज ठाकरे यांच्या शिवतीर्थ निवासस्थानी गणपती दर्शनासाठी भेट दिली. तर गेल्याच आठवड्यात दोन्ही पक्षांच्या नेत्यांची शिवतीर्थवर बैठक झाली. उद्धव ठाकरेंनी २०१७ मध्ये मनसेच्या सातपैकी सहा नगरसेवकांना आपल्या पक्षात घेतले, ज्यामुळे राज ठाकरे कमजोर झाले. आता उद्धव ठाकरेंना राज ठाकरेंच्या शहरी मराठी मतांची गरज आहे, त्यामुळे राज ठाकरे यांचा युतीमध्ये वरचष्मा दिसत आहे. एका राजकीय विश्लेषकाने नाव न सांगण्याच्या अटीवर सांगितले की, उद्धव ठाकरेंना मराठी मतांची गरज असल्याने युतीत राज ठाकरेंना अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे. एका मनसे नेत्याने सांगितले की, उद्धव ठाकरेंचा पक्ष नाजूक स्थितीत आहे, हे माहीत असल्याने राज ठाकरे मजबूत स्थितीतून वाटाघाटी करत आहेत.



दरम्यान, उद्धव ठाकरे, संजय राऊत आणि अनिल परब यांनी गेल्या आठवड्यात राज ठाकरे यांच्या शिवतीर्थ निवासस्थानी बीएमसी निवडणुकीतील जागावाटपावर सुमारे अडीच तास चर्चा केली. मात्र संजय राऊत यांनी या भेटीला कौटुंबिक भेट असे म्हटले. राऊत नेहमीच उद्धव आणि राज ठाकरे एकत्र येणार असल्याचे सांगत आले आहेत. विश्लेषकांनी सांगितले की, ङ्खङ्खराज ठाकरे यांच्या निवासस्थानी दोन तास घालवल्यानंतरही राऊत यांनी या भेटीला कौटुंबिक भेट म्हटले, याचा अर्थ राज ठाकरे यांनी काहीतरी मजबूत भूमिका घेतली असावी, ज्यामुळे उद्धव ठाकरे आणि त्यांचा पक्ष बॅकफूटवर गेला आणि राऊत यांना या भेटीला कौटुंबिक भेट म्हणावे लागले. यामुळे उद्धव ठाकरे अधिक अडचणीत आले आहेत, असेही ते म्हणाले

# मोताळा तहसीलदार हेमंत पाटील अँटी करप्शनच्या जाळ्यात!

**जनसंचलन/बुलढाणा**

बुलढाणा जिल्ह्यातील भ्रष्टाचाराच्या कारवायांवर अँटी करप्शन विभागाने मोठा हातोडा मारला असून मोताळा तहसीलदार हेमंत पाटील लाच घेताना रंगेहात पकडले गेले आहेत. अकोला अँटी करप्शन विभागाने शनिवारी धाडसी कारवाई करून तहसीलदाराला जाळ्यात ओढले. तक्रारदार शेतकऱ्याची वर्ग २ ची जमीन वर्ग १ मध्ये करण्यासाठी तहसीलदाराने तब्बल दोन लाख रुपयांची लाच मागितल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला. अखेर शेतकऱ्याने अँटी करप्शनकडे तक्रार दाखल केली आणि पथकाने सुयोजित सापळा रचून तहसीलदाराच्या बुलढाणा येथील राहत्या घरी दोन लाख रुपयांची लाचेची रक्कम स्वीकारताना पकडले. या कारवाईमुळे तहसील कार्यालयातील भ्रष्टाचाराच्या कारवायांवर नागरिकांतून तीव्र संताप व्यक्त होत आहे. शेतकऱ्यांच्या जमिनीच्या कामासाठी लाच मागणाऱ्या अधिकाऱ्यांना आता अटकसत्र भोगावे लागेल अशी चर्चा सुरु झाली आहे. अँटी करप्शनच्या या धाडसी कारवाईने पुन्हा एकदा प्रशासनातील भ्रष्टाचाराचे पडदे फाटले असून शेतकऱ्यांच्या हक्कासाठी लढणाऱ्यांना दिलासा मिळाला आहे



# उच्चशिक्षण नापास, की एटीकेटी?

## संपादकीय लेख

५ सप्टेंबर २०२५च्या शिक्षकदिनाच्या कार्यक्रमात बोलताना राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू म्हणाल्या, की ङ्गशाळा आणि उच्चशिक्षण संस्थांकडे स्मार्ट ब्लॅकबोर्ड, स्मार्ट वर्गखोल्या आणि इतर आधुनिक सुविधांचे एक महत्त्व आहे; परंतु स्मार्ट शिक्षक ही त्याहूनही महत्त्वाची गोष्ट आहे.फ शहाण्यांना शब्दांचा मार पुरेसा असतो; पण माणसे शहाणी असतील तरच! ५ सप्टेंबर २०२५ रोजी ङ्गनॅशनल इन्स्टिट्यूशनल रँकिंग फ्रेमवर्कफ्ने भारतातील उच्चशिक्षण संस्थांचा क्रमवारी अहवाल - २०२५ प्रसिद्ध केला आहे. त्यात महाराष्ट्रातील उच्चशिक्षणाची ङ्गप्रगतीफ ठळकपणे अधोरेखित झाली आहे. खासगी शिक्षणसंस्थांचे रँकिंग घोडे वर गेले आहे, तर राज्य विद्यापीठांची घसरण झालेली त्यात दिसते. महाराष्ट्राला उच्चशिक्षणाचा मोठा इतिहास आहे. मुंबई विद्यापीठ १८५७ मध्ये स्थापन झाले, तर डेक्कन कॉलेज, पुणे १८२१मध्ये स्थापन केले; पण आता महाराष्ट्रात उच्चशिक्षणाची अवस्था चिंताजनक आहे. तरीही ङ्गपोपटफ अत्यवस्थ आहे, असे मात्र कोणी म्हणायला तयार नाही. महाराष्ट्रातील उच्चशिक्षण संस्थांची निरनिराळ्या गटांमध्ये जी क्रमवारी एन.आय.आर.एफ.ने प्रसिद्ध केली आहे त्याचा आढावा खाली घेतला आहे. या क्रमवारीसाठी पाच निकष व प्रत्येक निकषात काही उपनिकष मिळून एकोणीस निकष निश्‍चित केले आहेत. त्याचे मूळ निकष असे आहेत - १) शिकविणे, शिकणे व संसाधने, २) संशोधन व व्यावसायिक कृती, ३) पदवी निष्पत्ती, ४) पोहोच व समावेशकता, ५) समज. प्रत्येक मूळ निकषाला व उपनिकषाला ङ्गवेटेजफ्ही देण्यात आलेले आहे. समग्र कामगिरी क्रमवारी महाराष्ट्रातील ७४पैकी ११ विद्यापीठांना पहिल्या १००मध्ये स्थान मिळाले आहे. २०२४मध्ये सुद्धा ११ विद्यापीठांना या यादीत स्थान मिळाले होते. या ११पैकी आय.आय.टी., मुंबई, होमी भाभा नॅशनल इन्स्टिट्यूट, मुंबई, सिंबायोसिस इंटरनॅशनल यांची क्रमवारी सुधारली आहे. मुंबई विद्यापीठ २०२४मध्ये पहिल्या १००मध्ये नव्हते, ते २०२५ मध्ये ९२व्या स्थानावर आहे. उरलेल्या सात संस्थांची क्रमवारी घसरली आहे. यामध्ये आयसर - पुणे, केमिकल टेक्नॉलॉजी इन्स्टिट्यूट - मुंबई, डी.वाय.पाटील विद्यापीठ - पुणे, दत्ता मेघे इन्स्टिट्यूट ऑफ हायर एज्युकेशन ॲण्ड रिसर्च - वर्धा, पुणे विद्यापीठ, नरसी मोनजी इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज - मुंबई व विश्‍वेश्‍वरैया नॅशनल इन्स्टिट्यूट - नागपूर यांचा समावेश होतो. १०१ ते २०० या गटात महाराष्ट्रातील केवळ तीन विद्यापीठे आहेत. राज्य विद्यापीठ गटात पहिल्या १००मध्ये महाराष्ट्रातील आठ विद्यापीठे आहेत. महाविद्यालयांच्या गटात १-१०० मध्ये तीन महाविद्यालये येतात. १००-२००च्या यादीत तीन महाविद्यालये आहेत व २००-३०० या यादीत सहा महाविद्यालये येतात. अभियांत्रिकी विद्यापीठांच्या पहिल्या १००च्या यादीत महाराष्ट्रातील सहा विद्यापीठ / संस्थांचा समावेश होतो. त्यात पाच संस्था शासकीय आहेत व एकच संस्था खासगी आहे. मॅनेजमेंट इन्स्टिट्यूट गटात खासगी संस्थांचा वरचष्मा जास्त आहे. त्यामुळे नऊ संस्थांपैकी यादीत समाविष्ट सात संस्था खासगी आहेत व केवळ दोन संस्था शासकीय आहेत. वैद्यकीय विद्यापीठांच्या पहिल्या ५०च्या यादीत महाराष्ट्रातील केवळ दोन खासगी विद्यापीठांचा समावेश आहे. महाराष्ट्रातील सार्वजनिक विद्यापीठांची कामगिरी व क्रमवारी या अहवालानुसार घसरलेली दिसते. ५७२५ महाविद्यालयांपैकी पहिल्या १००च्या यादीत फक्त तीन महाविद्यालये आहेत. यातून महाराष्ट्रातील उच्चशिक्षणाच्या प्रगतीचा बुडबुडा फुटलेला दिसतो. महाराष्ट्रात शिक्षकांशिवाय शिक्षण व्यवस्था चालविण्याचा ङ्गअभिनव प्रयोगफ महाराष्ट्र सरकार करत आहे. शालेय शिक्षण व उच्चशिक्षण या दोन्ही ठिकाणी हा ङ्गप्रयोगफ चालू आहे. महिला बालविकास शिक्षण खात्याच्या केंद्रीय संसदीय समितीने ऑगस्ट २०२५मध्ये आपला अहवाल संसदेला सादर केला. त्यात असे म्हटले आहे, की भारतात शालेय शिक्षणात १० लाख पदे रिक्त आहेत. यात महाराष्ट्राचा समावेश होतो. तोच प्रकार उच्च शिक्षणात आहे. महाराष्ट्रात ११ पारंपरिक विद्यापीठांत प्राध्यापकांची ६० टक्के पदे रिक्त आहेत. नागपूर विद्यापीठात ६६ टक्के, मुंबई विद्यापीठात ६४.६ टक्के, कोल्हापूर विद्यापीठात ६१ टक्के, पुणे व मराठवाडा विद्यापीठात ६० टक्के पदे रिक्त आहेत. (टाइम्स ऑफ इंडिया, जुलै २०२५) मुळात शिक्षक / प्राध्यापक नसतील तर स्मार्ट शिक्षक विद्यार्थ्यांना मिळणार कसे? शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची नवी भरती गेले १५-२० वर्षे झालेली नाही. कर्मचारी निवृत्त झाला तर शासनाकडून नवा कर्मचारी मिळत नाही. शिक्षक, प्राध्यापक यांच्या या कमतरतेवर उपाय म्हणून ङ्गकरार पद्धतीफ्चे किंवा ङ्गतासिका तत्त्वावरफ प्राध्यापक नेमले जात आहेत. कायमस्वरूपी काम आहे, यूजीसीच्या निकषाप्रमाणे अर्हताप्राप्त उमेदवार आहेत; पण त्यांना अनुदानित पदावर नेमले जात नाही. मुलांसाठी प्राध्यापक पाहिजे म्हणून नेट/सेट झालेला, पीएच.डी असलेला उमेदवार २० हजार ते २५ हजार रुपये मानधनावर संस्थेकडून नेमला जातो. हा प्रत्यक्षात वेठबिगार असतो. ना त्याला कोणतेही संरक्षण, ना आर्थिक लाभ. अनेक संस्थांमध्ये ८० ते ९० टक्के शिक्षक/ प्राध्यापक करारपद्धतीवर काम करत आहेत. वर्षानुवर्षे असे काम करणारे प्राध्यापक आज उच्च शिक्षणात आहेत. अशा प्राध्यापकांनी जीव तोडून मुलांना शिकवावे, अशी अपेक्षा करणे ही क्रूरता आहे. ङ्गतासिकाफ तत्त्वावर काम करणाऱ्या प्राध्यापकांना तासाला २०० रुपये मिळतात. त्यांना पाच-सहा महिने महाविद्यालयांत काम मिळते. उद्याची शाश्‍वती नसलेल्या या अर्हताप्राप्त प्राध्यापकांनी कोणते संशोधन करावे, कोणते पेपर आंतरराष्ट्रीय मासिकांत प्रसिद्ध करावेत अशी समाजाची, शिक्षणव्यवस्थेची अपेक्षा आहे? या रिक्त पदांचा पुढचा टप्पा म्हणजे सुमारे ७०-८० टक्के विनाअनुदानित महाविद्यालयांना कायमस्वरूपी प्राचार्य नाही. प्रभारी प्राचार्यच शिक्षणसंस्था ओढत असतात. जाहीरात दिल्यास चार-पाचपेक्षा जास्त उमेदवार मुलाखतीला येत नाही आणि निवड झालेला उमेदवार रुजू होईल याचीही खात्री नसते. अनुदानित महाविद्यालयांच्या प्राचार्यांच्या नियुक्तीला शासन मंजुरी देत नसल्यामुळे ४०-५० टक्के महाविद्यालयांची प्राचार्यपदे रिक्त राहतात व शिक्षणसंस्था किंवा विभाग नेतृत्वहीन राहतात. केवळ पैसे वाचवण्यासाठी शासनाकडून रिक्त पदे भरली जात नाहीत. शिक्षणावर, शिक्षक, प्राध्यापकांच्या वेतनावरचा खर्च हा ङ्गवायफळ खर्चफ आहे अशी शासनाची भूमिका असल्यामुळे एकूणच शिक्षणावरचा खर्च महाराष्ट्र शासन कमी-कमी करत आहे.






## बसस्थानक आवारातून दुचाकी चोरीला!



**जनसंचलन/ देऊळगाव राजा**

बस स्थानक आवारातील टीनशेडमधून मोटारसायकल चोरीला गेल्याची घटना १२ सप्टेंबर रोजी घडली. विशाल धर्मा साळवे (राह. आदर्श कॉलनी, देऊळगाव राजा) यांची दुचाकी क्रमांक (एमएच २८ एपी ७३३७) चोरीला गेली. मोटारसायकलची किंमत सुमारे ३० हजार रुपये असल्याची माहिती मिळाली आहे. यासंदर्भात १३ सप्टेंबर रोजी रात्री पोलिसांत तक्रार दाखल केल्यानंतर पोलिसांनी तपास सुरू केला आहे.

The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# अलौकिक विभूतिमत्व आनंदनाथ महाराज

राजाधिराज श्री अक्कलकोट स्वामी समर्थ महाराजांच्या प्रभावळीत फार फार मौल्यवान रत्ने स्वामी कृपेनेच लाभलेल्या अपार तेजाने तळपताना दिसतात. या अनर्घ्य रत्नांपैकी, एक अलौकिक विभूतिमत्व म्हणजेच, सद्गुरू आनंदनाथ महाराज हे होत. आनंदनाथ महाराज हे तळकोकणातील वालावल गावचे, म्हणून त्यांचे नाव पडले वालावलकर. पुढे ते वेंगुर्ले कॅम्प परिसरात स्वामी महाराजांचे मंदिर बांधून राहू लागले. तिथेच त्यांनी १९०३ साली ज्येष्ठ शुद्ध षष्ठीला जिवंत समाधी घेतली.

स्वामी महाराजांची कीर्ती ऐकून आनंदनाथ महाराज अक्कलकोटी दर्शनासाठी निघाले. इकडे स्वामी माऊलीलाही आपले लाडके लेकरू कधी एकदा भेटते असे झाले होते. म्हणून स्वामीराज महाराज स्वत:च अक्कलकोटबाहेर येऊन एका झाडावर वाट पाहत बसले होते. आनंदनाथ महाराज नेमके तेथेच येऊन जरा विसावले. झाडावरून उडी टाकून स्वामीराजांनी त्यांच्यासमोर प्रकट होऊन त्यांना खूण दाखवली. आपली साक्षात् परब्रह्ममाउली समोर उभी राहिलेली पाहून आनंदनाथांनी गहिवरून त्यांचे चरण हृदयी कवटाळले. स्वामीरायांनीही आपल्या जन्मजन्मांतरीच्या या लाडक्या निजदासाच्या मस्तकी कृपाहस्त ठेवून पूर्ण कृपादान केले. तसेच तोंडातून कफाचा बेडका काढून त्यांच्या ओंजळीत टाकला. त्या बेडक्यात इवल्याशा चरण पादुका स्पष्ट दिसत होत्या. हेच स्वामीमहाराजांनी आनंदनाथांना प्रसाद म्हणून दिलेले आत्मलिंग होय. आजही ते दिव्य आत्मलिंग वेंगुर्ले येथे नित्यपूजेत असून दर गुरुवारी भक्तांना त्याचे दर्शन मिळते.

स्वामी माऊलीने स्वमुखातून काढून दिलेल्या आत्मलिंग पादुका वेंगुर्ले येथे आहेत. स्वामी महाराजांचे श्रेष्ठ शिष्य सद्गुरू आनंदनाथ महाराज ह्यांची पवित्र संजीवन समाधी येथे आहे. शिर्डीच्या साईनाथाना जगतासमोर आणण्याच्या कार्यात यांचा मोलाचा सहभाग होता. स्वामी गुरुस्तव स्तोत्र, स्वामी चरित्रस्तोत्र, आत्मबोधगीता, भजनानंद लहरी, स्वामी समर्थ स्तवनगाथा (२७०० दिव्य अभंगांसहित) अशा स्वामी कृपेने भरलेल्या



अद्भुत दिव्य रचनांची निर्मिती करून संजीवन समाधिस्थ झाले. सद्गुरू आनंदनाथांचे नातू गुरुनाथबुवा वालावलकर यांनी आनंदनाथ यांचे स्वामी समर्थ कार्य नेटाने पुढे चालवले.

स्त्रियस्य चरितम् पुरुषस्य भाग्यम्फ या दोन्हींविषयी परमेश्वरदेखील अनभिज्ञ असतो अशा अर्थाचे एक संस्कृत वचन खरे ठरावे आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातील ङ्गवेंगुर्लेफ गावाला सिद्ध सत्पुरुषाचे सान्निध्य लाभावे या करिताच जणू नियतीने वालावलकर कुटुंबाची निवड केली असावी. या कुटुंबात जन्मलेला आणि ङ्गगुरुनाथ एकनाथ वालावलकरफ अशी नाममुद्रेची भरघोस खूण वागविणारा बालक चारचौघांसारखे लौकिक आयुष्य जगला, वाढला आणि गृहस्थाश्रमाचा स्वीकार करता झाला. ऐन उमेदीतल्या गुरुनाथ वालावलकरांनी चरितार्थासाठी हरड्याचा (औषधी गुणधर्मांचे फळ) विक्री व्यवसाय सुरू केला. मात्र सारे काही स्थिरस्थावर होत असल्याची जाणीव होईपर्यंत त्यांच्या चाकोरीबद्ध आयुष्याला एकाएकी नवे वळण लाभले आणि पुढे आयुष्याच्या अखेरीस गुरुनाथांची ओळख आध्यात्मिक जगताकरिता ङ्गश्री आनंदनाथ महाराजफ अशी झाली. हे कोणामुळे घडले, का घडले, कसे घडले या सर्व अगम्य आणि अतर्क्य प्रश्नांची उत्तरे केवळ अक्कलकोटनिवासी स्वामी समर्थांकडे होती. अक्कलकोटस्थ स्वामी समर्थांचा प्रिय शिष्य म्हणून स्वत:ची ओळख निर्माण करणाऱ्या व पुढे प्रस्थापितही करणाऱ्या आनंदनाथांचा जन्म तत्कालीन सावंतवाडी परगण्याच्या बांदा गावामधील मडुरे-डिगेवाडी येथे राहणाऱ्या वालावलकर कुटुंबामध्ये झाला. त्यांचे मूळ नाव गुरुनाथ. बालपण आणि तारुण्य सरताना गुरुनाथ उद्योगधंद्याच्या निमित्ताने वेंगुर्ला कॅम्प व बाजारभागात हरड्याचा व्यापार करू लागले. यानिमित्ताने त्यांचे मुंबईस वरचेवर येणे-जाणेदेखील होत असे. मुंबईच्या प्रिन्सेस स्ट्रीट येथे बळवंतराव भेंडे ऊर्फ तात महाराज यांच्या व्यापारी पेढीवर गुरुनाथांचा मुक्काम होत असे. तात महाराजांच्या घरी, जांभूळवाडी येथेही त्यांचे येणे-जाणे असे. तात महाराज अनेकदा बाबूलनाथ येथे जात असत त्यावेळेस गुरुनाथही त्यांच्या सोबत जात असत.

तात महाराज प्रपंचात राहूनही परमार्थात उच्चतम अवस्था प्राप्त केलेले साधक होते. त्यांना श्री स्वामी समर्थांचा अनुग्रह लाभला होता. एकेवेळी अक्कलकोट येथे गेले असताना त्यांना श्री स्वामी समर्थांच्या जागी साक्षात शंकराचे दर्शन घडले होते. तात महाराज गुरुनाथांना श्री स्वामी समर्थांविषयी नित्य सांगत असत. त्यामुळे गुरुनाथांची स्वामींना भेटण्याची तळमळ, उत्कंठा दिवसेंदिवस वाढती झाली.

एके दिवशी स्वामी समर्थांच्या दिव्य अनुभूतीची भेट व्हावी या तळमळीतून गुरुनाथांनी तडक अक्कलकोटच्या दिशेने धाव घेतली आणि ते स्वामीचरणी दाखल झाले. स्वामिरायांच्या भेटीसाठी मन आसुसलेले होते. कधी एकदा स्वामिचरणी नतमस्तक होऊ अशी त्यांची अवस्था झाली होती. या विचारात असताना त्यांना त्यांच्यामागे अस्पष्टशी हालचाल जाणवली. ते मागे वळून पाहतात तो काय! भक्ताभिमानी, कल्पतरू स्वामी समर्थ साक्षात उभे ठाकले होते. अक्कलकोटमधील स्वामींच्या सहवासातील ते काही क्षण गुरुनाथांच्या उभ्या आयुष्याला ढवळून काढते झाले. स्वामींच्या दिव्य, सगुण रूपामध्ये विरघळून गेलेले गुरुनाथ घरी आले असले तरीही मनाने मात्र स्वामींच्या चरणांपाशी घोटाळत होते. केवळ एका दृष्टिक्षेपात स्वामींनी त्यांचे आयुष्य बदलले. गुरुनाथांनी पत्नीची मनधरणी केली, घडला प्रकार सांगितला. त्यांची अवस्था पाहून त्यांच्या पत्नीने त्यांना ङ्गपुन्हा अक्कलकोटास जाण्यासफ आडकाठी केली नाही.

व्यापारधंद्याची जोखीम तात महाराज आणि पत्नीच्या खांद्यावर टाकून गुरुनाथ अक्कलकोटास निघाले. स्वामिस्वरूप परमेश्वराच्या सान्निध्यात अष्टौप्रहर रमणाऱ्या गुरुनाथांची भावावस्था दिवसेंदिवस प्रखर होत गेली. महाराजांची सेवा करण्यात गुरुनाथांचा सर्व वेळ खर्च होऊ लागला, देहभान नाहीसे झाले. ज्याला मोक्षरूपी वस्त्र प्राप्त झाले, तो देह झाकणाऱ्या वीतभर कापडाची तमा ती काय बाळगणार? स्वामी महाराजांनी गुरुनाथांमधील आत्मतत्त्व जागृत केले. बऱ्याचदा स्वामी गुरुनाथांना बोलावून ङ्गङ्गआनंद करा, आनंदनाथ व्हा!फफ असे सांगत असत. हे पाहून तेथील काही मंडळींनी गुरुनाथांचे नामकरण ङ्गआनंदनाथफ असे केले. स्वामिकृपा प्राप्त झाल्यावर आनंदनाथांमधील सुप्तावस्थेत असलेली काव्य प्रतिभा अधिक तीव्रतेने प्रकट झाली. स्वामी समर्थांचा कृपाप्रसाद आनंदनाथांसाठी सरस्वतीचा वरदहस्त ठरला. त्यांच्या काव्य प्रतिभेला स्वामींच्या दैवी साक्षात्काराचा स्पर्श झाला. आनंदनाथ महाराजांनी स्वामी महाराजांवर पाच हजारांहून अधिक अभंग, ङ्गअद्वैत बोधामृतसारफ व ङ्गअभेद कल्पतरूफ हे दोन ग्रंथ, त्याशिवाय श्रीगुरुस्तव, श्री स्वामिचरित्र, स्तोत्र तसेच आध्यात्मातील अनेक कूट विषयांवर विविध रचना केल्या आहेत. त्यातील काही साहित्य गुं. फ. आजगावकर यांनी ङ्गस्वामी समर्थ स्तवनगाथाफ या ग्रंथातून प्रसिद्ध केले. अशातच स्वामी समर्थांनी साक्षात सरस्वतीस्वरूप ङ्गआत्मलिंगफ प्रदान केल्यामुळे आनंदनाथांची प्रतिभासृष्टी अधिकच बहरास आली. काव्यरसामध्ये न्हाऊन गेलेली त्यांची सहजसुंदर पदे, अभंग यामुळे स्वामींच्या चरित्र रेखाटनास अधिक उठाव मिळाला. स्वामी समर्थांच्या प्रिय शिष्यांपैकी असलेल्या या महत्त्वाच्या शिष्योत्तमाने अल्पावधीतच स्वामी समर्थ संप्रदायामध्ये मानाचे स्थान प्राप्त केले. आनंदनाथांचे महत्त्वाचे कार्य म्हणजे त्यांनी केलेला स्वामिभक्तीचा प्रचार व प्रसार. स्वामिराज गुरू माझे आई, मजला ठाव द्यावा पायी। हा स्वामिभक्तांमध्ये विलक्षण लोकप्रिय असलेला नामगजर रचणारे आनंदनाथ महाराज यांचे आणखी एक महत्त्वपूर्ण आणि अलौकिक कार्य शिर्डीच्या साईबाबांना आध्यात्मिक जगतामध्ये प्रसिद्धीसफ आणण्याचे आहे.

# पायात पेटके आल्यास काय कराल?

या पेटयांची तीव्रता जास्त असेल तर होणाऱ्या वेदनेची तीव्रताही जास्त असते.तुम्ही झोपलेले असताना किंवा आराम करत असताना किंवा व्यायाम करत असताना पेटयांचे प्रमाण जास्त असते.शरीरातील द्रवाचं प्रमाण कमी किंवा कॅल्शिअमचं प्रमाण कमी झालं असताना खेळल्यास किंवा शारीरिक कष्ट केल्यास स्नायूंमध्ये पेटके येण्याची श्नयता असते. पेटके फ्नत खेळाडूंनाच नाही, तर कष्ट कणाऱ्यांना, गर्भवती स्त्रियांना, ५० नंतर वय झालेल्यांनाही पेटके येत असतात. दिवसा किंवा रात्रीच्या वेळी पायांत पेटके येऊ शकतात. उन्हाळ्यामध्ये हवा उष्ण असल्यामुळे घाम येतो आणि त्यामुळे आपल्या शरीरातील द्रवाचं प्रमाण झपाट्याने कमी होत जातं. शरीरातील पोटॅशिअम आणि मॅग्नेशिअम इलेट्रोलाईट्सच्या स्वरूपामध्ये घामावाटे शरीरातून बाहेर पडते. त्यामुळे शरीरामध्ये या घटकांची कमतरता निर्माण होऊन स्नायूंमध्ये पेटके येण्याचं प्रमाण वाढतं. व्यायाम करत असताना स्नायूंमध्ये पेटके आल्यास स्नायू ओढले गेल्याचं जाणवून वेदना होऊ लागतात.याला प्रतिबंध करण्याच्या उपाय म्हणून कॅल्शिअम, मॅग्नेशिअम आणि पोटॅशिअम यांचा आहारात समावेश करावा आणि भरपूर प्रमाणात पाणी प्यावे.


पेटके आल्यास काय करावे?

करत असलेले काम थांबवा, आणि पेटके आलेला भाग ताणण्याचा प्रयत्न करा. त्या भागाला मालीश करा.

स्नायूंमध्ये सूज असल्यास जळजळ न करणारी औषधे वेदनेपासून आराम देण्यास मदत करू शकतात.

क्षमतेनुसार व्यायाम करा आणि व्यायामात बदल करत राहा.

भरपूर द्रव पदार्थांचे सेवन करा, पॉटॅशिअमचे प्रमाण वाढवा, संत्री व केळी यात पॉटॅशिअम



असते.

पुरेशा प्रमाणात द्रव पदार्थांचं सेवन न करणे हे खेळताना पेटके येण्याचं कारण असतं.

# गोडाचा गोडवा श्रीखंड



श्रीखंड महाराष्ट्राची स्वीट डिश! महाराष्ट्रामधील खाद्यसंस्कृतीमध्ये श्रीखंड या पदार्थाला जास्त महत्त्व आहे. कोणतेही शुभकार्य असले की, घरामध्ये श्रीखंड-पुरीचा बेत तयार केला जातो. श्रीखंड विविध प्रकारात मिळते, जसे की केसर-पिस्ता श्रीखंड, आम्रखंड, फ्रुट श्रीखंड इ. सोबतीला गरमागरम पु-या असल्या तर किती छान!

कुठलेही सणवार हे गोडाधोडाशिवाय अपुरेच. सणांचं आणि गोडाचं नातं खूप घट्ट आहे अन् हे आपण आपल्याच काय इतर संस्कृतींमध्येही बघतो. अगदी प्रत्येक संस्कृतीत त्यांचा त्यांचा एक विशिष्ट गोड पदार्थ हा ठरलेला असतोच. एकूणच काय तर गोडाचा गोडवा हा खास क्षणांसाठी असतो, मग ती जिलेबी असू देत नाहीतर हलवा, खीर असू दे नाहीतर श्रीखंड या सगळ्या पदार्थांची आपलीच एक मज्जा आहे. गोड विषयावर सणावारांना केल्या जाणा-या या पदार्थामागे एक विशिष्ट इतिहास आणि तसेच त्याची वैज्ञानिक कारणही आहेत.

गोडधोड पदार्थाशिवाय नवीन वर्षाच्या उत्साहाची कल्पनाच होऊ शकत नाही. काही सण आणि गोडाचे पदार्थ यांचं नातं अतूट आहे. गुढीपाडव्याच्या सणाशी जोडला गेलेला गोड पदार्थ म्हणजे श्रीखंड. डाएटच्या कल्पनेने दक्ष झालेली मंडळीसुद्धा श्रीखंडाची बोटभर चव चाखल्याशिवाय राहात नाहीत. मग अगदी जातिवंत खवय्यांविषयी काय बोलावे? श्रीखंड-पुरीचा बेत म्हणजे सणाचा आनंद लुटून झाल्यावर दोन-चार तासांच्या निवांतपणाची ग्वाहीच. श्रीखंड हा दुधापासून बनणारा खास मराठी-गुजराती गोड खाद्यपदार्थ आहे. अतिशय साध्या रूपात श्रीखंड म्हणजे चक्का आणि साखरेचे मिश्रण म्हणता येईल. या मिश्रणात अधिक चवीसाठी सामान्यत: बदाम-पिस्ता, काजू, केशर, वेलदोडा, आंब्याचा रस (आमरस) इ. पदार्थ मिसळले जातात. आमरस मिळवला असता या पदार्थास आम्रखंड असे म्हणतात. हा महाभारतकालीन खाद्यपदार्थ असून तेव्हा त्यास शिकरणी या नावाने ओळखले जायचे. जुन्या काळी ८ प्रकारच्या शिकरणी बनत असत, असा उल्लेख सापडतो. असं म्हणतात की, महाभारतात महापराक्रमी भीम जेव्हा विराट राजाकडे बल्लवाचार्य म्हणून काम करत होता, तेव्हा त्याने शिखरिणी नामक पदार्थ बनवल्याचा उल्लेख येतो. त्या शिखरिणीत भीमाने ताजी फळे वापरल्याचा संदर्भ आहे. आजच्या फ्रूट श्रीखंडाचे मूळ थेट भीमापर्यंत मागे गेलेले पाहून गंमत वाटते. दुकानदार मंडळी सीताफळ श्रीखंड, स्ट्रॉबेरी श्रीखंड विकताना अशी जाहिरात करतात की, जणू काही हा नवा प्रयोग त्यांनीच केला असावा. पण यापुढे त्यांना ठामपणे भीमाचा दाखला देता येईल. जुन्याच पदार्थाचं हे नवं रूप चवीला मात्र इतक्या हजारो वर्षानंतरही तितकंच मिट्ट गोड राहिलेलं आहे. अर्थात या श्रीखंडाच्या पाऊलखुणा भीमापर्यंत मागे जात असल्या तरी काही संशोधकांच्या मते, श्रीखंडाची कृती त्या आधी अस्तित्वात आली असावी. गुराखी मंडळी वा कुणीही यात्रेकरू सोबत दही घेऊन प्रवासास निघाले असता, खाली ठेवल्यास दही ओघळेल या भीतीने ते त्यांनी वर टांगले असावे. सकाळी घट्ट झालेला चक्का त्यात गोड काही मिसळून खाल्ल्यावर अधिकच छान लागतो हे त्यांना जाणवले असावे. त्यातून पुढे सामान्य लोकांकडून राजदरबारी स्वयंपाकघरात या साध्याशा पदार्थावर शाही सजावट होऊन श्रीखंड लोकप्रिय झाले असावे, असा अंदाज आहे. आपण या सगळ्या पदार्थाच्या इतिहासाचे ठळक टप्पे शोधू शकतो, पण त्यांच्या निर्मितीमागची प्रेरणा ब-याचवेळा जर तरच्या चक्रातच अडकलेली राहाते. इतिहास तर असेही सांगतो की, श्रीकृष्णने घीवर हे पक्वान्न स्वत: शोधलं.

महाराष्ट्रामधील खाद्यसंस्कृतीमध्ये श्रीखंड या पदार्थाला जास्त महत्त्व आहे. कोणतेही शुभ कार्य असले की, घरामध्ये श्रीखंड-पुरीचा बेत तयार केला जातो. पण हे श्रीखंड आले तरी कुठून याचा शोध घेतल्यास संस्कृत साहित्यामध्ये त्याचे उल्लेख आपल्याला दिसतात. क्षीर आणि खांड या दोन शब्दांपासून या शब्दाची निर्मिती झाली आहे. या शब्दामधील क्षीर म्हणजे दूध तर खांड म्हणजे साखर होय. हा पदार्थ महाराष्ट्रासोबत राजस्थानमध्ये सुद्धा बनवला जातो. श्रीखंडमध्येसुद्धा अनेक प्रकार येतात, त्यामध्ये आम्रखंड याचा समावेश होतो. महाराष्ट्रमध्ये श्रीखंडामध्ये पाणी टाकून पीयूष हा प्रकार सुद्धा केला जातो. श्रीखंड या शब्दाची निर्मिती आणि उगम याविषयी दोन विचार आढळतात. काहींच्या मते प्राचीन काळापासून अस्तित्वात असलेल्या शिखरिणी या पदार्थनामाचा अपभ्रंश म्हणजे श्रीखंड. तर काहींच्या मते क्षीर-खंड यापासून श्रीखंड हा शब्द निर्माण झाला असावा. क्षीर अर्थात दूध, त्याचे दही आणि त्यापासून निर्माण श्रीखंड असा हा प्रवास आहे. भारतात एकेकाळी दुधदुभत्याला काहीच कमी नव्हती. त्यामुळे श्रीखंडासारखा पदार्थ सणासुदीच्या निमित्ताने लोकप्रिय झाला यात आश्चर्य नाही. गुजरात, महाराष्ट्र, राजस्थान, पंजाब ही राज्यं श्रीखंडाच्या लोकप्रियतेत वरचा क्रमांक पटकावून आहेत. महाराष्ट्रात तर परप्रांतीय, गोड पदार्थांची ओळख होईस्तोवर सणासुदीला होणा-या गोडाच्या पदार्थात श्रीखंडाचा क्रमांक अव्वल होता.

होळीत पुरणाची पोळी, गणपतीला मोदक अशी गणितं पक्की असली तरी उरलेल्या सणांना श्रीखंडाची निवड अधिकतर होताना दिसायची. फ्रूट श्रीखंडाचा इतिहास महाभारतापर्यंत मागे नेताना आम्रखंड ही मात्र खास महाराष्ट्रीय आणि गुजराती जेवणाची खासियत आहे. आज गुलाबजाम, रसगुल्ला, अंगुरबासुंदी यांच्या समान वाढत्या प्रभावात श्रीखंड हा अनेकातला एक पर्याय होऊन राहिला असला तरी पंचपक्वान्नांच्या पंगतीला श्रीखंडाचा मान आजही तितकाच मोठा आहे. मराठी जेवणाच्या शाही पंगतीचा श्रीखंडपुरी हा आकर्षणबिंदू म्हणता येईल. घरच्याघरी बनवलेले वा आताच्या काळाच्या सोयीने तयार मागवलेले श्रीखंड, तेलात न्हाऊन आलेल्या पुरीच्या सोबतीने मुखात विसावताना आज आनंदी आनंद झालाचा फील आपोआप देते. इतरवेळी पंगतीचे शिष्टाचार काटेकोरपणे पाळणारे आपण बोटाने श्रीखंड उचलून तोंडात चाटवताना कोण काय म्हणेल याच्या पलीकडे आलेले असतो. या श्रीखंडाचा मिट्ट गोडपणा आपल्याला त्या खाद्यतंद्रीकडे अलगद घेऊन येतो. जेवण आटोपल्यावर येणारी सुस्ती, ही तंद्री पुढचे काही तास टिकवून ठेवते. श्रीखंडाचे साफल्य हे आपल्याला या भावावस्थेपर्यंत आणण्यातच आहे.

# ब्रिटनमध्ये शालेय विद्यार्थ्यांना शिकवला जातोय दयाळूपणा

भारतीय संस्कृती ही अतिशय प्राचीन आणि उच्च मानली जाते. त्यामुळेच या संस्कृतीचा सर्वत्र आदर सन्मान केला जातो. दयाळूपणा हा भारतीयांच्या ठाई असलेला एक प्रमुख गुण आहे. मात्र, हाच दयाळूपणा आता ब्रिटनमधील शाळांमधील अभ्यासक्रमाचा एक भाग झाला आहे.आजकाल ब्रिटनच्या शाळांमध्ये मुलांना दयाळू बनवण्यासाठी सामाजिक चळवळ सुरू आहे. मुलांना दयाळूपणाची शक्ती जाणवून दिली जात आहे. खरंच, शाळांमध्ये दयाळूपणा हा अभ्यासक्रमाचा एक भाग बनवला जात आहे, जो लहानपणापासूनच दया करायला शिकवतो.तब्बल ३० हजारांपेक्षा अधिक शाळांनी दयाळूपणाला अभ्यासक्रमाचा भाग बनवले आहे. काईंडनेस यूके (घळपवपशीी णघ) या संस्थेने शिक्षक आणि शाळांना ५० हजारांहून अधिक दयाळूपणा किटचे वाटप केले आहे. या किटमध्ये दयाळूपणावर चर्चा करण्यापासून ते क्रियाकलापांपर्यंत मुलांना दयाळूपणा शिकवण्यासाठी डिझाइन केलेला कार्यक्रम समाविष्ट आहे. ब्रिटिश रेडक्रॉस सोसायटीदेखील शिक्षक आणि मुलांना दयाळूपणाच्या शक्तीची ओळख करून देत आहे.



काइंडनेस यूकेचे सीईओ डेव्हिड जैमिली यांनी याबाबत सांगितले की, दया आणि परोपकाराची संस्कृती भारताच्या संस्कृतीत आधीपासूनच रुजलेली आहे. शालेय अभ्यासक्रमात दयाळूपणाचा औपचारिक समावेश करून भारत जगासमोर एक उत्तम उदाहरण मांडू शकतो.

देशाची अफाट लोकसंख्या दयाळूपणाचा प्रसार करण्यात महत्त्वाची भूमिका बजावू शकते, कारण अनेक प्रस्थापित आणि उदयोन्मुख देश नेतृत्वासाठी भारताकडे पाहतात.लॉनशिल अकादमीचे शिक्षक मॅकिंनटॉस म्हणतात की, हा एक चांगला नवोपक्रम आहे. आम्ही शाळांमध्ये दयाळूपणा सप्ताह साजरा करतो. दयाळूपणाचा मुलांच्या वेळापत्रकात समावेश करण्यात आला आहे.मुलांसाठी बाल दया समिती स्थापन करण्यात आली आहे. प्रत्येक दयाळू गट स्वत:च्या संसाधनांचा वापर करून निधी उभारतो.मुलांना आठवड्यातून दयाळू कार्यांची ५ असाइनमेंटदेखील दिली जाते. यामुळे त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण होतो.

# सोहळ्यात मी नाहले

आमच्या घराशेजारच्यांनी मला बोलावल्याचा निरोप आला. म्हणून मी गेले त्यांच्या वरच्या हॉलमध्ये मला त्या घेऊन गेल्या आणि मला काही बोलताच येईना, तुम्ही जरा जाऊन हॉल उघडा, मी सामान घेऊन येते म्हटल्याने मी कडी काढली आणि थक्कच झाले.

माझा मुलगा सून, नातू, भावंडे असे सगळे जवळचे नातलग आत होते. हॉल पूर्ण सजवला होता. समोरच्याच भिंतीवर माझं नाव आणि फुलांनी ६१चा अंक तयार केला होता. सारं मला सुखद धक्का देणार आणि सर्वांच्या चेह-यावरचा आनंद सारं काही मला मी स्वप्नात नाहीना, असं विचार करायला लावणारं होतं. मी खरंच खूप भारावून गेले. सवंकष आनंदाचा हा माझ्या आयुष्यातील पहिलाच भारावलेला प्रसंग.

मी प्रवेश करताच सर्वांनी टाळ्या वाजवल्या आपली आश्चर्याचा धक्का देण्याची कल्पना पार पडली. याचा आनंद माझ्या माणसांना झालेला तर सर्व जाणिवा गोठून गेलेली मी. मी आले तोवर माझ्या पाठोपाठ सर्वांमध्ये सामील असूनही घरातून मी येईपर्यंत निर्विकार राहिलेले माझे पती आले. सर्वांनी माझं औक्षण केलं सारे काही आनंदाचे सोहळे पार पडले.


माझा साठ वर्षाचा जीवनप्रवास हे सर्व आज आठवताना क्षणक्षण आठवतो आहे. एका खेडेगावात माझा जन्म अत्यंत गरीब घरात झाला. माझ्या आत्याला मूल नव्हतं. ती मला मी खूप बाळ असताना घेऊन गेली. मला तीच माझी आई माहीत झालेली. त्यामुळे ती माझी आई अशीच बाकीची नाती होत गेली. मी माध्यमिक शाळेत जाण्याच्या सुमारास माझी आई गेली. तोपर्यंत मला एक भाऊ झाला होता, तो खूप लहान होता. वडिलांची अत्यंत दुर्गम ठिकाणी शिक्षकाची नोकरी होती, त्याठिकाणी ते आम्हाला दोघांना घेऊन राहू शकत नव्हते आणि आम्ही दोघांनी राहण्याचा तो काळ आणि तशी परिस्थिती नसल्याने आम्हाला एका मावशीकडे रहावं लागलं. मी एसएससीची परीक्षा दिली आणि माझं लग्न झालं. मी मोठ्या शहरात राहायला आले. शहर मोठं आणि ज्या घरात आले तेही कुटुंब मोठं, त्यामुळे ठिकाण आणि घर तेथील माणसं सा-यांनीच मी भांबावले होते. परिस्थितीने आणि आलेल्या प्रसंगातून मी तोंड बंद ठेवून कसं राहायचं शिकले होते. पडेल किंवा कोणी सांगेल ते मी काम करत राहिले. व्यवहार, चाली-रीती सर्व काही शिकण्याचं आणि घरातील माणसांची मर्जी सांभाळणे हा माझा अभ्यासक्रम खूप वर्ष राहिला. मला आता कधी मागे वळून आयुष्याकडे पाहताना आणि आत्ताच्या मुलामुलींचे संसार पाहताना मनात येतं, माझं लग्न लवकर झालं आणि मला माझी अशी स्वत:ची मतं काहीच पुसटशीसुद्धा नसल्याने, मी त्या-त्या वेळी कोणी सांगेल ते शिकत गेल्याने आयुष्य शिकले. घरकामाबरोबर उरलेल्या वेळात काम म्हणून आणि संसाराला हातभार म्हणून मी भरतकाम करून देण्याचा पर्याय निवडला आणि कामाला लागले. पोस्टाची आरडी जमा करण्याचं काम स्वीकारलं. माझ्यासाठी मी दुचाकी शिकून घेतली. या सगळ्यासाठी मला माझ्या पतीने मोलाची साथ दिली आणि त्यामुळेच मला माझं जीवन घडवता आलं. नाहीतर मी शिक्षण, आर्थिक, सामाजिक सर्वच बाबतीत मागास होते. माझ्या लग्नानंतर मी माझ्या भावाला, वडिलांना माझ्या नवीन कुटुंबात सामावून घेऊ शकले. माझ्या सर्व एकत्रित असलेल्या कुटुंबाची मी कायम मनातून ऋणी राहिले. जे काम करायचं ते मनापासून, श्रमाने आणि निरपेक्षपणे या भावनांचं माझ्या आयुष्यात भांडवल खूपच फायदेशीर राहील. मला दोन मुलगे झाले. आता मी स्वतंत्र संसार सुरू केला. आत्तापर्यंत आमचं म्हणून एक घरकुल तयार झालं होतं. मुलगेही छान शिकले आणि आर्थिकदृष्ट्या रांगेला लागले. मोठा मुलगा परदेशी गेला




आता तो सहकुटुंब तेथे राहतो. त्याने घरात मात्र संपर्क अजिबात कमी केला नाही. दोनही सुना माझ्या मुली म्हणून राहतात. माझ्या मोठ्या सुनेला अत्यंत गरज असल्याने, काही कारणांनी मला ऑस्ट्रेलियाला एकटीने जावं लागलं आणि मनात भीती ठेवून का असेना, तिची गरज म्हणून मी तिथे जाऊन पोहोचले सुद्धा. मला आता कधीच एकटेपणा जाणवत नाही, लहानपणापासून मी एकटी असणारी आता माझं कुटुंब माझ्यासकट नऊजणांच झालं आहे. माझ्यासाठी ते नवरसांच परिपूर्ण रसात्मक आहे. हे पूर्णत्व मला लाभलं यातच मी खूश आहे. मी शहरात राहिल्याने माझ्या नात्याने संबंधित जे नातेवाईक शिक्षण, नोकरी संदर्भात आले त्यांना या शहरात रुजण्यासाठी आवश्यक ती मदत करण्यासाठी माझ्या पूर्ण कुटुंबाने सहकार्य केलं. त्यामुळे इथे रुजलेल्या नातलगांना माझं घर आधारघर राहील. देवाच्या दयेने आणि घरातील सर्वांच्या परोपकारी स्वभावाने मला कोणालाही आवश्यक ती मदत करता आली. अगदी कोणी माझ्या कोकणातून आरोग्याची दोरी बळकट करण्यासाठी उपचारासाठी हॉस्पिटलला आले असतील, तरीही त्यांच्यासाठी लागणारी सोय करणे हे प्रत्येकाने मुख्यत: माझ्या पतीने त्याची जबाबदारी स्वीकारून ते काम आपलसं केलं.

आज मला आर्थिक स्थिरता तर आली आहेच. माझ्या जन्माने मी कोणीच नसलेल्या आणि सुरुवातीची काही वर्ष खडतर गेलेल्या मला काहीच अपेक्षा आणि काहीच ध्येय न नेमून दिल्याने परमेश्वराने मला जे आज दिलं आहे, मी जी काही आज आहे तो माझा मला स्वर्ग वाटत आहे. आज माझ्या साठ वर्ष पूर्ण होणा-या आयुष्याकडून मला सर्व काही मिळालं आहे. नातं हे जन्मानं काय, यापेक्षा आपल्या जीवनात कसे जगतो, किती प्रेमाने जगतो, तशी नाती तयार होऊन ती आपल्याबरोबर जगतात. आपल्याला आनंद आजच्यासारखा देण्याला झटतात आणि कमकुवत वेळेला आधार द्यायला बरोबर असतात. हे जीवनातलं सत्य जगून पटलं आहे. मी आज माझ्या आयुष्याकडून माझ्या माणसांकडून पूर्ण समाधानी आहे. आज सर्वांनी माझ्या साजरा करत असलेल्या सोहळ्यात मी अक्षरश: न्हाऊन निघाले आहे.

# ऑस्ट्रियामध्ये स्पंज सिटी तयार होत आहे



जगभरातील शहरांनी हवामान बदलाचे धोके ओळखले आहेत आणि त्यांचा सामना करण्यासाठी उपाययोजनांवर काम करत आहेत. कारण बहुतांश शहरे हवामानाचा प्रकोप सहन करण्यासाठी तयार केलेली नाहीत. काँक्रीटपासून बनवलेल्या इमारती केवळ उष्णतेची लाट वाढवतात. याशिवाय पावसाचे पाणी जमिनीत मुरत नाही, अशा पद्धतीने या इमारती आणि शहरे बांधण्यात आली आहेत.या चुकीचा परिणाम म्हणून गेल्या काही महिन्यांत युरोपातील काही देशांना विनाशकारी वादळे आणि पुराचा सामना करावा लागला आहे.अशा आपत्ती टाळण्यासाठी ऑस्ट्रियामध्ये असे शहर तयार केले जात आहे, जे महापूआणि हवामानाची तीव्रता सहन करण्यास सक्षम असेल. व्हिएन्नाच्या शेजारी असलेल्या ॲमसीबोजेनमध्ये बनवलेल्या या स्पंज सिटीफ्तील झाडं पाहून वाटतं की ती एखाद्या योद्ध्यासारखी शहरे जमिनीत सतत पाणी वाहत राहण्यासाठी गुरुत्वाकर्षणाच्या श्नतीचा वापर करतील. जेणेकरून हे पाणी तलावात साठवता येईल.सोप्या भाषेत सांगायचे तर, ही स्पंज शहरे ही नैसर्गिक जलचक्राची प्रतिकृती बनवतील.

ऑस्ट्रेलियाच्या युनिव्हर्सिटी ऑफ ॲडलेड लँडस्केप आर्किटेक्चर अँड अर्बन डिझाईन प्रोग्रामचे संचालक स्कॉट हॉकेन याबाबत म्हणतात की, ही संकल्पना पाण्याशी हुशारीने काम करण्याची आहे, जेणेकरून पूर कमी धोकादायक होईल. गेल्या दशकभरात स्पंज सिटीचे अनेक घटक जगभरातील मेट्रो शहरांमध्ये समाविष्ट केले गेले आहेत. चीनने २०१३ मध्ये कोंजियन यांची कल्पना स्वीकारली. तेथे ३० शहरांमध्ये या संकल्पनेची चाचणी करण्यात यश आले आहे. त्यामुळे सन २०३० पर्यंत ८० टक्के शहरी भाग या चौकटीत साचेबद्ध करण्याचे नियोजन आहे. कोपनहेगन येथील वेस्टरब्रोच्या एका उद्यानात पृष्ठभागाच्या खाली तलावांमध्ये मोठ्या प्रमाणावर पावसाचे पाणी साठवले गेले आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# सापळ्यात अडकला अधिकारी

कल्याणी येथील सागर हॉटेलमध्ये सुमित आणि अमित हे सख्खे चुलत भाऊ ठरल्याप्रमाणे हॉटेलमध्ये हजर झालेले होते व पोलीस अधिकारी सुरेश यांची ते वाट बघत होते. काही वेळातच पोलीस अधिकारी सुरेश दोन अनोळखी व्यक्तींसह सागर हॉटेलमध्ये आले आणि सुमित आणि आम्ही बोलणी झाल्यानंतर याच्या पुढील तुमचं काम हे दोघेजण करतील, असं सुरेश याने सुमित आणि अमितला सांगितलं व ठरल्याप्रमाणे कामाची अर्धी रक्कम तुम्ही आणलीत का? अशी त्यांनी विचारणा केली. त्यावेळी दोघांनी ङ्गहो आणली आहेफ असं सांगून ती देण्यासाठी त्यांनी चार लाख रुपये असलेली पैशाची बॅग सुरेशला देण्यासाठी पुढे केली. त्याचवेळी दबा धरून बसलेले लाचलुचपत प्रतिबंध कायद्याचे अधिकारी यांनी रंगेहाथ पोलीस अधिकारी सुरेश यांना पैशासकट पकडले.

अमित आणि सुमित हे सुशिक्षित बेरोजगार होते. कुठेही त्यांना नोकरी लागत नव्हती आणि त्यातच त्यांची ओळख भिवंडी येथील पोलीस अधिकारी सुरेश यांच्याशी झाली. सुरेश यांनी दोघांना ङ्गमी तुम्हाला पोलीस सेवेमध्ये भरती करून घेतो, माझी ओळख मंत्रालयात सुद्धा आहे व गृह खात्यामध्येही आहेफ असं त्यांना सांगितलं व बोलणी करण्यासाठी आणि कागदपत्रांची पडताळणी करण्यासाठी भिवंडी येथील हॉटेलमध्ये त्यांना बोलावलं होतं. सुरेशने दोघांची कागदपत्र बघितल्यानंतर शंभर टक्के मी तुम्हाला नोकरीला लावतो, असं त्यांना आश्वासन दिलं आणि त्यासाठी प्रत्येकी पाच पाच लाख



रुपये खर्च येईल, असं त्यांनी सांगितलं. दोघांनी विचार केला की, आपल्याला काही खटपट न करता कोणताही त्रास सहन करता जर सरकारी सेवेमध्ये नोकरी मिळत असेल, तर रिस्क घेण्यात कोणती अडचण नाही, तेही तयार झाले आणि घरी आल्यानंतर वडीलधाऱ्या माणसांना त्यांनी झालेल्या सर्व गोष्ट सांगितली. ङ्गआम्हाला सरकारी नोकरी मिळत आहे, त्यासाठी पैसे भरावे लागणार आहेत. त्याकरिता आम्हा दोघांना पाच पाच लाख रुपये द्यावे, असं त्याने आपल्या घरच्या लोकांना विनंती केली. पण, घरातील ज्येष्ठ मंडळींना ही गोष्ट कुठे तरी खटकली. सुरेश फक्त जुजबी ओळखीचा माणूस होता. त्याच्यावर विश्वास कसा ठेवायचा? या मुलांना समजावून त्यांनी बघितलं, पण मुलं काही समजण्यास तयार नव्हती. उलट आपल्याच घरातील ज्येष्ठांवर ते भडकू लागले. ङ्गआम्हाला नोकरी मिळते, तर तुम्ही आम्हाला मदत करत नाही. मग घरातील लोक शेजारीच असलेले समाजसेवक धीरज यांच्याकडे या मुलांना घेऊन गेले आणि त्यांनी सुरेशची चौकशी करतो, असं वचन दिलं.

धीरज यांनी अमित आणि सुमितच्या कुटुंबाला घेऊन लाच प्रतिबंधक कायद्याच्या अधिकाऱ्यांची भेट घेऊन झालेल्या प्रकाराबद्दल माहिती दिली आणि या अधिकाऱ्यांनी सुमित आणि अमितच्या घरात या लोकांना मदत करतो, असं सांगून एक सापळा रचला. त्या सापळ्याप्रमाणे दोघांनाही दोन दोन असे चार लाख रुपये देण्यात आले. त्या नोटांचे नंबरही नोंद करण्यात आले होते आणि पोलीस अधिकारी सुरेश याला त्यांनी फोन केला की, आमच्याकडे पैशांचा बंदोबस्त झालेला आहे. तर सुरेश यांनीच कल्याणच्या सागर हॉटेलमध्ये भेटायला त्यांना बोलावलं होतं. त्याचवेळी लाच घेताना पोलीस अधिकारी सुरेश याला लाचलुचपत प्रतिबंधक कायद्याच्या अधिकाऱ्यांनी रंगेहाथ पकडलं. लाच प्रतिबंधक अधिकाऱ्यांच्या सापळ्यात पोलीस अधिकारी सुरेश सहजरीत्या फसला गेला. रंगेहाथ पकडल्या गेल्यामुळे लाच प्रतिबंध कायद्याअंतर्गत त्याच्यावर कल्याण न्यायालयात खटला सुरू असून खटला प्रलंबित आहे.

आजकालची तरुण पिढी कोणतेही कष्ट, मेहनत घेत नाही. आपल्याला सहजासहजी सर्व गोष्टी उपलब्ध व्हाव्यात असा त्यांचा मनसुबा असतो. पैसे फेकले की काम झालं पाहिजे, अशी त्यांची मनोवृत्ती झालेली आहे आणि याच मनोवृत्तीचा फायदा समाजातील अशी विकृत माणसं उचलत आहेत. जास्त करून सुशिक्षित बेरोजगारांना हेरून सरकारी सेवेतील लोक पैशाच्या लालसेपोटी अशा तरुणांना फसवत आहेत. पण, आजकालच्या पिढीला ते लक्षात येत नाही आणि जेव्हा लक्षात येतं, तेव्हा आपण फसवले गेलेलो आहोत याची जाणीव होते. समाजसेवकांच्या हुशारीमुळे अमित आणि सुमित याचे कुटुंब मोठ्या संकटापासून खरोखर बचावले

# भार



पूर्वी दिवाळीच्या दिवशी सकाळी बरीच लोकं दारात फराळ, पोहे वगैरे मागायला येत. तेव्हा त्यांच्यासाठी डबाभर पोहे, थोडे फराळाचे पदार्थ मी बाहेरच काढून ठेवत असे. एका वेळी चार-पाचजण कदाचित एकाच घरातील किंवा एकाच वस्तीतली एकदम येत. बरोबर प्रत्येकाची एकेक पिशवी असायची. त्यात प्रत्येकाला मूठभर पोहे, एखादी चकली, करंजी असं एका कागदात गुंडाळून त्यांच्या पिशवीत टाकायचं. पण आता शिक्षणाच्या प्रसारामुळे शहाणी झालेली ही माणसं किंवा त्यांच्या पुढच्या पिढ्यांना आता घरोघरी जाऊन, असं काही मागायची लाज वाटत असावी. त्यामुळे जवळपास कोणी येत नाही. पण परवा लाखणकाकूफ आली सकाळी. लांबूनच तिची ङ्गओ वैनीफ हाक ऐकू आली. बाहेर जाऊन पाहिलं, तर लाखणीन पायरीवर धापा टाकत बसली. तिची अवस्था बघून तिला पाणी हवं का? विचारलं. ती नको म्हणाली. मग आत जाऊन तिला फराळाचे काही पदार्थ पिशवीत बांधून दिले. पन्नास रुपये हातावर टेकवले. तेव्हा तिला भरून आलं. ङ्गयाचीच मला गरज होती गो! खायला कोण नाय कोण देतं. पण हातात पैसा नाय. आता काम नाय गे करूक जमत!

तुका देव काय पण कमी पडूक देवचा नायफअसा तोंडभर आशीर्वाद देऊन ती पुढच्या घरी गेली. तिच्या त्या थकलेल्या पाठमोऱ्या आकृतीकडे मी पाहत राहिले. खूप महिन्यांपूर्वी एकदा वाटेत भेटली होती. डोक्यावर कसलीतरी पिशवी होती. कशीबशी कमरेवर हात ठेवून हळूहळू चालत घरी चालली होती. तिला म्हटलं, अगो, या वयात आता कशाला ही ओझी नेतेस डोक्यावरून? काय करू ग्ये? नशीबाचे भोग भोगावे लागतंत.!फ मग सगळी कर्मकहाणी तिने थोडक्यात सांगितली. पाच-सहा वर्षांपूर्वी तिचा नवरा गेला. मोलमजुरी करायचा. थोडी दारू प्यायचा. पण बाकी गरीब होता स्वभावानं. तीही चार घरी कामाला जायची. पोरगा तरणाताठा. शिक्षणात काय डोकं नव्हतंच. आठवी-नववीपर्यंतच शिकला नि शाळा सोडली. तोही मग कुणाच्या तरी हाताखाली गवंडीकाम वगैरे करून चार पैसे कमवू लागला. तोपर्यंत ठीक होतं. पण त्याचं लग्न झालं. दहावी शिकलेली बायको मिळाली. म्हणजे त्यांच्या घरात ती हुशारच! पोरगा तिच्या कलेने वागू लागला. सासऱ्याला सुनेच्या हुशारीचं कौतुक होतं. पण सासूचं एकही काम हलकं होत नव्हतं. सुनेने काहीतरी कामाला हातभार लावावा ही तिची अपेक्षा काही चुकीची नव्हती. पण सून बोलण्यात एकदमच ताडफाड होती. ती कोणाचं काही ऐकून घेत नसे. शेवटी व्हायचं तेच झालं. सासू-सुनेचे खटके उडायला लागले. तेव्हा सासूने मुलाला वेगळं राहायला सांगितलं. रोजच्या कटकटीपेक्षा स्वतंत्र संसार थाटलेला बरा. तुम्ही सुखी, आम्ही सुखी! मुलानेही पडत्या फळाची आज्ञा मानून एकाच घरात वेगळा संसार थाटला.



# आरोग्यासाठी अंघोळीचे तंत्र कसे असले पाहिजे ?

अंघोळीच्या संबंधी आपल्या सवयी सतत बदलत असतात.हिवाळ्यात अनेकजण काही दिवस अंघोळ करत नाहीत, तर उन्हाळ्यात बरेचजण दिवसातून दोन-तीन वेळा अंघोळ करतात. परंतु आपल्याला अंघोळीचे महत्व समजून घ्यायला हवे आणि आपल्या जीवनशैलीशी संबंधित इतर गोष्टींप्रमाणेच तुम्ही अंघोळीसाठी काही नियमांचीही विशेष काळजी घेतली पाहिजे.अनेक तज्ञ सकाळपेक्षा संध्याकाळी अंघोळ करणे अधिक फायदेशीर मानतात. कारण अंघोळ करताना तुम्ही केवळ शरीराची स्वच्छता करत नाही, तर त्या वेळी तुमचे रक्ताभिसरणही सुधारते आणि अंघोळ केल्याने तुमची मानसिक उदासीनताही दूर होते.सकाळी नियमित वेळेवर जागे होऊन ताजेतवाणे व्हा, तुम्ही कितीही थकलेले असले तरीही चांगल्या आरोग्यासाठी उपयुक्त ठरणारी दिनचर्या विकसित करा.झोपण्याची आणि दररोज त्याच वेळी जागे होण्याची वेळ निश्चित करा. तुमच्या शरीराला वेळेवर झोपायला शिकवणारी सर्वसमावेशक झोपण्याच्या वेळेची दिनचर्या विकसित करा. अशा प्रकारे जागे व्हा की तुमच्या शरीराला कळेल की खरोखर सकाळ झाली आहे.गरम पाण्याने आंघोळ केल्यानंतर शारीरिक थकवा दूर होतो. पण त्वचेचं भरपूर नुकसान होते. यामुळे गरम पाण्याऐवजी थंड पाण्याने आंघोळ करावी. थंड पाण्याने आंघोळ करणं त्रासदायक वाटत असल्यास कोमट पाण्याचा वापर करावा.

पण अति गरम पाण्याने आंघोळ करणं टाळावं. तुम्ही सुद्धा आंघोळीदरम्यान या पाच चुका करत असाल तर त्वचेचं नुकसान होऊ शकते. त्वचा निरोगी ठेवण्यासाठी योग्य ती काळजी घ्यावी.बहुतेक लोक आंघोळ करताना केसांवर वारंवार शॅम्पू वापरतात, परंतु जर तुमची टाळू तेलकट नसेल तर तुम्हाला दररोज केस धुण्याची गरज नाही.

# बळीराजांची शिवार फेरी! ११ जिल्ह्यातील हजारो शेतकरी शिवारफेरीला हजेरी लावणार!

## आव्हाने व संधी यावर चर्चासत्र!कृषी शास्त्रज्ञ डॉ.अमोल झापे काय सांगतात?

**जनसंचलन/बुलढाणा**

डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठात होणाऱ्या शिवारफेरीची तयारी जोमाने सुरू झाली आहे. कृषी विद्यापीठाने विकसित केलेले तंत्रज्ञान, सुधारित पीकवाण व शिफारशी थेट शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने ही शिवारफेरी २० सप्टेंबरपासून सुरू होणार असून, तीन दिवस चालणार आहे.शेती उत्पादन वाढवा ॲग्रो विशेष मार्केट इन्टेलिजन विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील ११ जिल्ह्यांमधील हजारो शेतकरी या शिवारफेरीला हजेरी लावणार असल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. कुलगुरू डॉ. शरद गडाख यांच्या मार्गदर्शनाखाली शिवारफेरीचे स्वरूप बदलून ती ऑक्टोबरऐवजी सप्टेंबर महिन्यात आयोजित केली जाते.या शिवार फेरीचा शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने लाभ घेण्याचे आवाहन बुलढाणा कृषी विज्ञान केंद्राचे शास्त्रज्ञ डॉ.अमोल झापे यांनी केले आहे. विद्यापीठ स्थापना दिनाचे औचित्य साधून यावर्षी डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला यांची शिवार फेरी दि. २० सप्टेंबर ते २२ सप्टेंबर,२०२५ दरम्यान आयोजित करण्यात आली असून या कार्यक्रमाचे उद्घाटन दि.२० सप्टेंबर,२०२५ रोजी सकाळी ठीक ११.०० वाजता देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या शुभहस्ते होणार आहे.

या शिवार फेरीचे म्हणजे थेट प्रात्यक्षिक कार्यक्रमाचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे शेतकरी, संशोधक, धोरणकर्ते व उद्योगधंदे भागधारक आदींना कृषी तंत्रज्ञानाची देवाण-घेवाण करण्यासाठी,अत्याधुनिक कृषी पद्धतीबद्दल जाणून घेण्यासाठी व शाश्वत आणि पर्यावरणास अनुकूल पद्धतीची खात्री करून पीक उत्पादकता वाढवण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देणे असे असून या तीन दिवसीय शिवार फेरीमध्ये खालील वैशिष्ट्यपूर्ण बाबींचा समावेश आहे. ( तृणधान्य, कडधान्य, नगदी पिके, तेलबिया, भाजीपाला, फळपिके , चारा पिके ) विविधखाजगीकृषिनिविष्ठाकंपन्यांचीथेटप्रात्यक्षिके या तीन दिवसांमध्ये राज्यातील एकूण १,००,००० शेतकरी शिवार फेरीमध्ये सहभागी होतील असे अपेक्षित आहे. विद्यापीठाच्या विविध संशोधन विभागाचे ११०० हेक्टर क्षेत्र शेतकऱ्यांना प्रात्यक्षिक म्हणून पाहण्याची संधी उपलब्ध होणार आहे.

भव्य स्वरुपात कृषी उत्पादन तंत्रज्ञानाचे थेट प्रक्षेत्रावर प्रात्यक्षिके पाहण्याची आणि कृषी शास्त्रज्ञांशी चर्चा करण्याची संधी शेतकऱ्यांना डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला यांनी दिलेली आहे.या शिवार फ ेरीच्या कार्यक्रमात शेतकऱ्यांची एकाच वेळी गर्दी होऊ नये म्हणून बुलढाणा जिल्ह्यासाठी नियोजित असलेल्या दिवशी म्हणजेच दि. २० सप्टेंबरला बुलढाणा जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने या शिवार फेरीचा लाभ घ्यावा.

# पत्रकारांच्या समस्या सोडविण्यासाठी मी नेहमीच तत्पर

## अ.भा.मराठी पत्रकार परिषदेच्या डिजिटल मीडिया अधिवेशनात डॉ.भागवत कराड

**जनसंचलन/ छत्रपती संभाजीनगर**

पत्रकार हे वर्षानुवर्ष समाजासाठी काम करतात. त्यांच्या समस्या मी नेहमीच गांभीर्याने घेत असतो. त्यामुळे पत्रकारांच्या आरोग्यविषयक व रेल्वेविषयक समस्या सोडविण्यासाठी मी कसोशीने प्रयत्न करीन, असा विश्वास माजी केंद्रीय अर्थ राज्यमंत्री तथा राज्यसभा खासदार डॉ. भागवत कराड यांनी व्यक्त केला.

अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेशी सलग्न असलेल्या डिजिटल मीडिया परिषदेच्या पहिल्या राज्यस्तरीय अधिवेशनात डॉ.भागवत कराड बोलत होते.अध्यक्षस्थानी अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस. एम. देशमुख होते.

यावेळी व्यासपीठावर परिषदेचे अध्यक्ष मिलिंद आष्टीवकर, विश्वस्त किरण नाईक, विश्वस्त शरद पाबळे, डिजिटल मीडियाचे प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे, कार्याध्यक्ष शिवराज काटकर, सरचिटणीस प्रा.सुरेश नाईकवाडे, कोषाध्यक्ष मंजूरभाई शेख, उपाध्यक्ष गणेश मोकाशी, गो. पी.लांडगे, लातूर विभागीय सचिव सचिन शिवशेटे, ज्येष्ठ पत्रकार धनंजय लांबे, डॉ.अनिल फळे, डॉ.मोहम्मद अब्दुल कदीर, अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे छत्रपती संभाजीनगर जिल्हाध्यक्ष बालाजी सूर्यवंशी, सचिव प्रकाश भगनुरे, कार्याध्यक्ष कानिप अन्नपूर्णे, मुंबई प्रतिनिधी सुनील वाघमारे, उपाध्यक्ष महादेव जामनिक, कोषाध्यक्ष ब्रह्मानंद चक्करवार यांच्यासह मान्यवर पदाधिकारी उपस्थित होते.



यावेळी डॉ.भागवत कराड यांनी पत्रकारांच्या विविध समस्यांविषयी सोडवणूक करण्यासंबंधी मार्गदर्शन केले. तसेच पत्रकारांच्या आरोग्यविषयक, रेल्वेविषयक व छोट्या-मोठ्या व्यवसायाला बळकटी देण्यासाठी मुद्रा लोन विषयी पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले. प्रमुख वक्ते तुळशीदास भोईटे व रवींद्र पोखरकर यांनी मार्गदर्शन केले.

ज्येष्ठ पत्रकार धनंजय लांबे यांनी ङ्गङ्कए.आय. आणि मराठी पत्रकारिताङ्कङ्क, या विषयावर तर डॉ.अनिल फळे यांनी ङ्गङ्कडिजिटल मीडिया : श्वास महाराष्ट्राचाङ्कङ्क, या विषयावर मार्गदर्शन केले. प्रमुख पाहुण्यांचे स्वागत अध्यक्ष बालाजी सूर्यवंशी,सचिव प्रकाश भगनुरे, कार्याध्यक्ष कानिफ अन्नपूर्णे, मुंबई प्रतिनिधी सुनील वाघमारे, उपाध्यक्ष महादेव जामनिक,कोषाध्यक्ष ब्रह्मानंद चक्करवार, धनंजय लांबे, डॉ. अनिल फळे, डॉ.मोहम्मद अब्दुल कदीर यांनी केले.

अध्यक्षीय समारोपात एस.एम. देशमुख यांनी डिजिटल मीडियाच्या विविध प्रश्नांना वाचा फोडली. सरकार अद्यापही यु ट्युबच्या पत्रकारांना पत्रकार मानायला तयार नाही. पत्रकारांच्या प्रश्नांसंदर्भात राज्य सरकार चालढकल करत असल्याचा आरोप त्यांनी केला. पत्रकार संरक्षण कायदा मंजूर होऊन सात वर्षे झाली. तरी सरकार अद्यापही अधिसूचना काढायला तयार नाही. पत्रकारांच्या पेन्शनचे, अधिस्वीकृतीधारक पत्रकारांचे प्रश्न प्रलंबित असल्याचेही त्यांनी सांगितले.

अधिवेशनाचे प्रास्ताविक बालाजी सूर्यवंशी यांनी तर आभार प्रकाश भगनुरे यांनी मानले. या अधिवेशनात ज्येष्ठ पत्रकार राम अग्रवाल, नागेश गजभिये, स.सो.खंडाळकर, डॉ,धनंजय लांबे, डॉ. मोहम्मद अब्दुल कदीर, जगन्नाथ सुपेकर, रमेश खोत, यांचा पत्रकारितेतील दीर्घ सेवेबद्दल सन्मानपूर्वक सत्कार करण्यात आला. या अधिवेशनासाठी राज्यभरातील मुद्रित माध्यमे, इलेक्ट्रॉनिक मीडिया, यु ट्युब चॅनेल व पोर्टलच्या पत्रकार व संपादकांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती.

# भाजपाच्या शासकीय योजना प्रचार प्रसार

## समितीच्या जिल्हाध्यक्ष पदी अंबादास घेवंदे

**जनसंचलन/बुलढाणा**

बुलडाणा जिल्हा भारती जनात पार्टीची विस्तारीत जिल्हा कार्यकारीणी नुकतीच जाहिर करण्यात आली आहे. यामध्ये भाजपाच्या शासकीय योजना प्रचार प्रसार समितीच्या जिल्हाअध्यक्ष पदी अंबादास घेवंदे यांची नियुक्ती जिल्हाध्यक्ष विजयराज शिंदे यांनी केले आहे. अंबादास घेवंदे हे एक सामाजी कार्यकर्ते आहे. त्यांचा शासकीय व प्रशासकीय क्षेत्रात गाढा अभ्यास आहे. तसेच शासनाच्या विविध योजना आणि उपक्रम यासंदर्भात त्यांना सखोल माहिती आहे. त्यांनी आतापर्यंत जिल्ह्यात अनेक गावामध्ये शासनाच्या योजनांचा लाभ नागरीकांना मिळवून दिला आहे. ते सतत निस्वार्थी भावनेतुन



जनतेची समेवा करत असल्यामुळे त्यांच्यावर भाजपा शासकीय योजना प्रचार प्रसार समितीची जबाबदारी देण्यात आली आहे. नियुक्ती पत्र देवुन त्यांच्या भावी वाटचालीला भाजपाचे जिल्हाध्यक्ष विजयराज शिंदे यांनी शुभेच्छा दिल्या आहे



# बातमी हक्काची! डिजिटल मीडियाचा दबदबा कायम!

## अ.भा.मराठी पत्रकार परिषदेच्या डिजिटल मीडियाचे अधिवेशन! -माजी राज्यमंत्री डॉ.भागवत कराड म्हणाले.. पत्रकारांच्या समस्या सोडविण्यासाठी कटीबद्ध!







**जनसंचलन/बुलढाणा**

पत्रकार हे वर्षानुवर्ष समाजासाठी काम करतात. त्यांच्या समस्या मी नेहमीच गांभीर्याने घेत असतो. त्यामुळे पत्रकारांच्या आरोग्यविषयक व रेल्वेविषयक समस्या सोडविण्यासाठी मी कसोशीने प्रयत्न करीन, असा विश्वास माजी केंद्रीय अर्थ राज्यमंत्री तथा राज्यसभा खासदार डॉ. भागवत कराड यांनी व्यक्त केला.

अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेशी सलग्न असलेल्या डिजिटल मीडिया परिषदेच्या पहिल्या राज्यस्तरीय अधिवेशनात डॉ.भागवत कराड बोलत होते.अध्यक्षस्थानी अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम. देशमुख होते.

यावेळी व्यासपीठावर परिषदेचे अध्यक्ष मिलिंद आष्टीवकर, विश्वस्त किरण नाईक, विश्वस्त शरद पाबळे, डिजिटल मीडियाचे प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे, कार्याध्यक्ष शिवराज काटकर, सरचिटणीस प्रा.सुरेश नाईकवाडे, कोषाध्यक्ष मंजूरभाई शेख, उपाध्यक्ष गणेश मोकाशी, गो. पी.लांडगे, लातूर विभागीय सचिव सचिन शिवशेटे, ज्येष्ठ पत्रकार धनंजय लांबे, डॉ.अनिल फळे, डॉ.मोहम्मद अब्दुल कदीर, अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे छत्रपती संभाजीनगर जिल्हाध्यक्ष बालाजी सूर्यवंशी, सचिव प्रकाश भगनुरे, कार्याध्यक्ष कानिप अन्नपूर्णे, मुंबई प्रतिनिधी सुनील वाघमारे, उपाध्यक्ष महादेव जामनिक, कोषाध्यक्ष ब्रह्मानंद चक्करवार यांच्यासह मान्यवर पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी डॉ.भागवत कराड यांनी पत्रकारांच्या विविध समस्यांविषयी सोडवणूक करण्यासंबंधी मार्गदर्शन केले. तसेच पत्रकारांच्या आरोग्यविषयक, रेल्वेविषयक व छोट्या-मोठ्या व्यवसायाला बळकटी देण्यासाठी मुद्रा लोन विषयी पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले. प्रमुख वक्ते तुळशीदास भोईटे व रवींद्र पोखरकर यांनी मार्गदर्शन केले.

ज्येष्ठ पत्रकार धनंजय लांबे यांनी ए.आय. आणि मराठी पत्रकारिता, या विषयावर तर डॉ.अनिल फळे यांनी डिजिटल मीडिया : श्वास महाराष्ट्राचा, या विषयावर मार्गदर्शन केले. प्रमुख पाहुण्यांचे स्वागत अध्यक्ष बालाजी सूर्यवंशी,सचिव प्रकाश भगनुरे, कार्याध्यक्ष कानिफ अन्नपूर्णे, मुंबई प्रतिनिधी सुनील वाघमारे, उपाध्यक्ष महादेव जामनिक,कोषाध्यक्ष ब्रह्मानंद चक्करवार, धनंजय लांबे, डॉ. अनिल फळे, डॉ.मोहम्मद अब्दुल कदीर यांनी केले.

अध्यक्षीय समारोपात एस.एम.देशमुख यांनी डिजिटल मीडियाच्या विविध प्रश्नांना वाचा फोडली. सरकार अद्यापही यु ट्युबच्या पत्रकारांना पत्रकार मानायला तयार नाही. पत्रकारांच्या प्रश्नांसंदर्भात राज्य सरकार चालढकल करत असल्याचा आरोप त्यांनी केला. पत्रकार संरक्षण कायदा मंजूर होऊन सात वर्षे झाली. तरी सरकार अद्यापही अधिसूचना काढायला तयार नाही. पत्रकारांच्या पेन्शनचे, अधिस्वीकृतीधारक पत्रकारांचे प्रश्न प्रलंबित असल्याचेही त्यांनी सांगितले.

अधिवेशनाचे प्रास्ताविक बालाजी सूर्यवंशी यांनी तर आभार प्रकाश भगनुरे यांनी मानले. या अधिवेशनात ज्येष्ठ पत्रकार राम अग्रवाल, नागेश गजभिये, स.सो.खंडाळकर,डॉ,धनंजय लांबे, डॉ. मोहम्मद अब्दुल कदीर, जगन्नाथ सुपेकर, रमेश खोत, यांचा पत्रकारितेतील दीर्घ सेवेबद्दल सन्मानपूर्वक सत्कार करण्यात आला. या अधिवेशनासाठी राज्यभरातील मुद्रित माध्यमे, इलेक्ट्रॉनिक मीडिया,युट्युब चॅनेल व पोर्टलच्या पत्रकार व संपादकांसह या कार्यक्रमासाठी बुलडाणा येथून सर्वांना परिचीत असलेले सर्व ब्रँड चॅनल्स चालक-मालक पत्रकार उपस्थित होते कार्यक्रमात पत्रकार संघाचे राज्य उपाध्यक्ष चंदू नाना बरदे,विभागीय सचिव जितेंद्र कायस्थ पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष रंजितसिंग राजपूत,सोशल मीडिया जिल्हाध्यक्ष गणेश सोळुंके,राजेश डिडोळकर, नितीन शिरसाट, वसीम शेख,कासिम शेख,दीपक मोरे, युवराज वाघ,पवन सोनारे,विजय देशमुख, शिवाजी मामलकर,,सुनील मोरे,अजय राजगुरे, ओम कायस्थ, इस्त्रार देशमुख,रहमत अली,प्रेम कुमार राठोड, इफतेखार खान मन्सूर खान,सैय्यद साहिल सैय्यद राजू,रियाज खान,शेख सोहिल,असरण खान,प्रकाश जेऊघाले,सुधाकर मानवतकर,प्रशांत सोनुने,केके न्यूज,मुक्तार भाई,महेंद्र बेराड,मोहन चौकेकर,रवींद्र फोलाने,प्रतीक सोनपसारे, आदेश कांडेलकर अनिल राठोड,राहुल सरदार,राजेश कोल्हे,रवींद्र गव्हाळे,करण झनके, बबन ठेपाळे, पंडित सावळे,शयजाद नवाब सह आदी मान्यवर व पत्रकार बांधव उपस्थित होते.

# सेवा पंधरवाड्या अभियानाअंतर्गत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्य १७ सप्टेंबर रोजी भव्य रक्तदान शिबीर

**जनसंचलन/बुलडाणा**

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा ७५ वा वाढदिवस संपूर्ण देशात सेवाभावनेतुन साजरा केल्या जात आहे. बुलडाण्यात सुध्दा भारतीय जनता पार्टीच्या वतीने दि. १७ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी १०.०० वाजता भाजपा जिल्हा कार्यालय मशिवालयफयेथे भव्य रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्य १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोंबर २०२५ पर्यंत विविध सेवाभाव, लोकउपयोगी अभियान राबवुन सेवा पंधरवाडा साजरा केल्या जात आहे. या पंधरवाड्याची सुरूवात मोदींजीच्या वाढदिवसापासून सुरू होणार आहे. १७ सप्टेंबर रोजी सकाळी ९.०० वाजता स्वच्छता मोहीम, १०.०० वाजता शिवालय येथे रक्तदान शिबीर घेवुन केल्या जाणार आहे. या शिबीराला जिल्हयतील सर्व भारतीय जनात पाटीच्या पदाधिकारी, कार्यकर्ते, सेवा पंधरवाड्याचे संयोजक, सहसंयोजक, मंडल अध्यक्ष, मंडल पदाधिकारी,



सर्व आघाड्यांचे पदाधिकारी तसेच ज्यांना रक्तदान करायचे आहे अश्या सर्वांनी उपस्थित रहावे असे आवाहन जिल्हाध्यक्ष विजयराज शिंदे व सेवा पंधरवाड्याचे जिल्हा संयोजक चंद्रकांत बर्दे यांनी केले आहे.

पत्रकारीतेचा धर्म
आम्ही निभावणार
हॅलो बुलडाणा
सिटी न्यूज टीव्ही & सोशल चॅनल
वेब साईड & पोर्टल चॅनल
वृत्त पेपर हार्ड कॉपी सह - ई पेपर
कुठली ही बातमी निशुल्क
***


दैनिक निडर निर्भीड
जनसंचलन
काही तक्रार असल्यास संपर्क
शिव शॉपिंग कॉम्प्लेक्स, कारंजा चौक बुलडाणा मो.9822720784,9373359040
पिन 443001

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेंच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८